# सहकारी बँकांतील कर्मचाऱ्यांच्या लसीकरणाची जबाबदारी घेण्यास राज्य बँक तयार

## अडीच लाखांपेक्षा अधिक जणांना लाभ शक्य

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** राज्यातील सहकारी बँकांमधील सर्व कर्मचाऱ्यांच्या लसीकरणाचा खर्च उचलण्याची तयारी राज्य सहकारी बँकेने दर्शवली आहे. यामध्ये राज्य बँकेच्या स्वतःच्या कर्मचाऱ्यांशिवाय ३१ जिल्हा बँकांमध्ये २० हजार २४ आणि नागरी बँकांमध्ये एक लाख ९० हजार कर्मचारी आहेत. पुण्यात ९८००, तर मुंबईस्थित ६० बँकांमधून २० हजार ३०८ कर्मचारी आहेत. याशिवाय इतर जिल्ह्यांमधील कर्मचारी मिळून अडीच लाखांपेक्षा अधिक जणांना लसीकरणाचा लाभ मिळणे शक्य होणार आहे.

१ मे पासून १८ ते ४४ वयोगटातील नागरिकांचे लसीकरण सुरू करण्यात येणार आहे. याबाबत राज्य सरकार लवकरच लसीकरण धोरण जाहीर करणार आहे. राज्य सरकार ज्या वयोगटाकरिता मोफत लसीचे धोरण निश्चित करेल, त्या व्यतिरिक्त १८ वर्षांवरील सहकारी बँकिंग क्षेत्रातील सर्व सेवकांच्या लसीकरणाची जबाबदारी राज्य बँक घेणार आहे. याबाबतचा प्रस्ताव राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे पाठवला आहे.

याबाबत बोलताना राज्य बँकेच्या प्रशासकीय मंडळाचे अध्यक्ष विद्याधर अनास्कर म्हणाले, 'प्रत्येक जिल्ह्यातील शासन यंत्रणेची मदत घेण्याबरोबरच मोठ्या रुग्णालयांबरोबर सामंजस्य करार करून प्रत्येक सेवकाला 'विशेषाधिकार वैद्यकीय सेवा ओळखपत्र' देण्यात येणार आहे. पुणे जिल्ह्याकरिता जहांगीर रुग्णालयासोबत बोलणी सुरु असून जहांगीर रुग्णालयाने प्रत्येक बँकेच्या ठिकाणी कार्डियाक रुग्णवाहिकेसह दोन डॉक्टर व इतर आवश्यक कर्मचाऱ्यांसह दररोज ३०० सेवकांचे लसीकरण करण्याचा प्रस्ताव दिला आहे. या सेवेसह सर्व सेवकांना वैद्यकीय सेवा ओळखपत्राच्या माध्यमातून सर्व वैद्यकीय सेवांवर दहा ते २० टक्के सवलतीची योजना सादर केली आहे. तसेच वैद्यकीय सेवा ओळखपत्रासाठी नोंदणी करताना कोणत्याही प्रकारचे शुल्क आकारले जाणार नाही'

### शिखर संस्था म्हणून लसीकरणाचा निर्णय

राज्य बँकेच्या स्वतःच्या कर्मचाऱ्यांशिवाय ३१ जिल्हा बँकांमध्य २० हजार २४ आणि नागरी बँकांमध्ये एक लाख ९० हजार सेवक वर्ग आहे. पुणे जिल्ह्यातील सेवकांची संख्या ९८००, तर मुंबईस्थित ६० बँकांमधून २० हजार ३०८ सेवक वर्ग कार्यरत आहे. इतर जिल्ह्यांमधील सेवकांच्या आकडेवारीचे संकलन करण्यात येत आहे. करोना काळात सहकारी बँकिंग क्षेत्रातील सर्व कर्मचाऱ्यांनी अविरत सेवा देत अर्थव्यवस्था गतिमान ठेवण्याचे काम केले आहे. त्यामुळे राज्यातील सर्व सहकारी बँकांचे पालकत्व स्वीकारलेली शिखर संस्था म्हणून लसीकरणाची जबाबदारी राज्य बँक घेत आहे, असेही राज्य बँकेच्या प्रशासकीय मंडळाचे अध्यक्ष अनास्कर यांनी सांगितले.

# शिक्षण क्षेत्रातील दूरदृष्टी असणारे नेतृत्व हरपले

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे डॉ. अरुण निगवेकर यांना श्रद्धांजली

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** काळाच्या पुढे जाऊन शिक्षणाचा विचार करणारे, नव्या संकल्पना प्रत्यक्षात आणणारे, उत्तम प्रशासक आणि जमिनीवर पाय ठेवून शिक्षणात मोठ्या प्रमाणात गुणवत्तापूर्ण बदल घडवणारे व्यक्तिमत्त्व हरपले, अशा शब्दांत ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डॉ. अरुण निगवेकर यांना शिक्षण क्षेत्रातील मान्यवरांनी श्रद्धांजली वाहिली.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू, विद्यापीठ अनुदान आयोगाचे माजी अध्यक्ष आणि शिक्षणतज्ज्ञ डॉ. अरुण निगवेकर यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी विद्यापीठातर्फे सोमवारी श्रद्धांजली सभा झाली. विद्यापीठाचे कुलगुरू प्रा.डॉ. नितीन करमळकर, डॉ. एन. एस. उमराणी, कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार, विद्यापीठ अनुदान आयोगाचे माजी उपाध्यक्ष डॉ. भूषण पटवर्धन, व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. संजय चाकणे, डॉ. पंडित विद्यासागर, डॉ. दिलीप जोग, सेन्टर फॉर मॉडेलिंग अँड सिम्युलेशनचे प्रा. डी. जी. कान्हेरे, स्कूल ऑफ एनर्जी स्टडिजचे अध्यक्ष प्रा. एस. व्ही. घैसास, प्रा. अजित केंभवी, डॉ. चंद्रशेखर चितळे, डॉ. सुरेश गोसावी, डॉ. गणेश हेगडे आदी उपस्थित होते.

डॉ. निगवेकर यांच्यासह काम करतानाच्या आठवणी, भौतिकशास्त्र विभागात त्यांनी राबवलेली कार्यपद्धती, विद्यापीठांना ई संशोधनपत्रिका वापरू देण्याची कल्पना, राष्ट्रीय मूल्यांकन परिषद (नॅक) आणि आयसर सुरू करण्यासाठीचे त्यांचे योगदान याबाबतचे अनुभव या वेळी सांगितले गेले. 'गुणवत्तापूर्ण शिक्षणात डॉ. अरुण निगवेकर यांचे काम खूप मोठे आहे. विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र विभागातील तज्ज्ञांनी देशाला खूप मोठे नेतृत्व दिले. डॉ. निगवेकर सरांनी दाखवलेल्या वाटेवरून आता विद्यापीठाला पुढे नेण्याचा प्रयत्न करणे हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल,' असे डॉ. करमळकर यांनी सांगितले.

# निरोगी फुफ्फुसांसाठी 'सहा मिनिटे चालण्याची चाचणी'

## करोना रुग्णांसाठी आरोग्य विभागामार्फत जनजागृती

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** करोना साथरोगाच्या काळात आपली फुफ्फुसे निरोगी आहेत याची खात्री करण्यासाठी 'सिक्स मिनिट वॉक टेस्ट' ची मदत घेण्याचे आवाहन आरोग्य विभागाकडून करण्यात येत आहे. सहा मिनिटे चालल्यानंतर ज्या नागरिकांच्या रक्तातील प्राणवायूची पातळी ९३-९४ एवढी आहे, त्यांची फुफ्फुसे निरोगी आहेत, हे समजण्यासाठी ही चाचणी उपयुक्त ठरणार आहे.

आरोग्य विभागाच्या आढावा बैठकीत मुख्य सचिव डॉ. प्रदीप व्यास यांनी जिल्हा स्तरावरील यंत्रणांना या चाचणीबाबत जनजागृती करण्याच्या सूचना दिल्या आहेत. ताप, सर्दी, खोकला अशी लक्षणे असलेले, करोना चाचणीमध्ये संसर्ग दर्शवणारे मात्र गृह विलगीकरणात उपचार घेणारे नागरिक ही चाचणी करून फुफ्फुसांची कार्यक्षमता तपासू शकणार आहेत. चालण्यापूर्वी तपासलेली प्राणवायूची पातळी आणि चालल्यानंतर तपासलेली प्राणवायूची पातळी यांमध्ये तीन टक्के घट असल्यास रुग्णाला प्राणवायू कमी पडतो आहे, हे स्पष्ट होईल.

### चाचणी कोणासाठी

- ताप, सर्दी, खोकला झालेल्या रुग्णांसाठी.
- सौम्य लक्षणे असलेल्या गृह विलगीकरणातील रुग्णांसाठी.

### चाचणी कशी करावी

- पल्स ऑक्सिमीटर वापरुन प्राणवायूची पातळी तपासावी.
- ऑक्सिमीटर बोटाला लावून सहा मिनिटे हळू चालावे.
- पायऱ्यांवर चढ-उतार करू नये.
- सहा मिनिटे चालल्यानंतर पुन्हा प्राणवायू पातळी तपासावी.
- ज्येष्ठ नागरिकांनी तीन मिनिटे चालण्याची चाचणी करावी.
- ही चाचणी दिवसातून दोन वेळा करावी.
- त्यात तीन टक्के घट असल्यास, किंवा प्राणवायू पातळी ९३-९४ पेक्षा कमी असल्यास डॉक्टरांशी संपर्क साधावा.

# औंध रस्त्यावरील सिंध सोसायटीत ज्येष्ठ दाम्पत्याला लुटले

## १५ लाख ८० हजारांचा ऐवज लुटून चोरटे पसार

**पुणे :** औंध रस्त्यावरील सिंध सोसायटीतील एका बंगल्यात शिरलेल्या चोरट्यांनी ज्येष्ठ दाम्पत्य आणि कामगाराला कोंडून हिरेजडित दागिने, परदेशी चलन आणि रोकड असा १५ लाख ८० हजारांचा ऐवज लुटून नेल्याची घटना रविवारी रात्री घडली.

याबाबत ज्येष्ठ महिलेने चतुःशृंगी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. ज्येष्ठ दाम्पत्य सिंध सोसायटीतील एका बंगल्यात राहायला आहे. त्यांनी एकाला घरकामास ठेवले आहे. तो स्वयंपाकी म्हणून काम करतो. रविवारी रात्री ज्येष्ठ दाम्पत्य आणि कामगार बंगल्यात होते. त्या वेळी तिघे जण बंगल्यात शिरले. त्यांनी कामगाराला चाकूचा धाक दाखविला. कामगाराला चाकूचा धाक दाखवून चोरट्यांनी त्याला पहिल्या मजल्यावर नेले.

चोरट्यांनी दाम्पत्याला चाकूचा धाक दाखवून पैसे कुठे ठेवले आहेत, अशी विचारणा केली. तेव्हा तक्रारदार ज्येष्ठ महिलेने चोरट्यांना पर्स दिली. पिशवीत सत्तर हजारांची रोकड होती. चोरट्यांनी ज्येष्ठ दाम्पत्य आणि कामगाराला प्रसाधनगृहात डांबून ठेवले. कपाटातील हिरेजडित दागिने आणि अमेरिकन डॉलर काढून घेतले. चोरटे बंगल्यातून बाहेर पडल्याची खात्री झाल्यानंतर कामगाराने दरवाजा लाथ मारून उघडला. दाम्पत्याचा मुलगा दुसरीकडे राहायला आहे. घाबरलेल्या दाम्पत्याने या घटनेची माहिती त्याला दिली. त्यानंतर या घटनेची माहिती पोलिसांना देण्यात आली. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी घटनास्थळाची पाहणी केली. पोलीस उपनिरीक्षक मोहन जाधव तपास करत आहेत.

# 'भारतातील स्थिती भयकारी, हृदयद्रावक...'

## गूगल-मायक्रोसॉफ्टच्या भारतीय वंशाच्या प्रमुखांकडून मदतीची घोषणा

पीटीआय, ह्यूस्टन/ वॉशिंग्टन

करोनाच्या कहराविरुद्ध भारतातील संकटस्थिती आणि रुग्णशय्या, प्राणवायू व औषधांच्या तुटवड्यासह आरोग्य यंत्रणेवर पडत असलेल्या प्रचंड ताण पाहता, गूगल आणि मायक्रोसॉफ्ट या दोन जागतिक बड्या तंत्रज्ञान कंपन्यांच्या भारतीय मूळ असलेल्या प्रमुखांनी मदतीचा हात पुढे केला आहे.

नवीन करोनाबाधित रुग्णसंख्येत ३,५२,९९१ हा विक्रमी उच्चांक भारताने सोमवारी नोंदविला, तर दर दिवशी सुमारे २,८०० मृत्यूंसह एकूण करोना बळींची संख्या दोन लाखांच्या वेशीवर जाऊन पोहोचली असल्याचे केंद्रीय आरोग्य मंत्रालयाची आकडेवारी दर्शविते.

भारतातील करोनाचे बिघडत चाललेले संकट हे भयकारक असल्याचे नमूद करीत, गूगलकडून 'गिव्ह इंडिया', युनिसेफ यांच्या माध्यमातून वैद्यकीय सामग्रीचा पुरवठा करण्यासाठी, उच्च जोखीमग्रस्त समुदायांमध्ये काम करणाऱ्या संस्थांना मदत म्हणून १३५ कोटी रुपयांची तरतूद करीत असल्याचे गूगलचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुंदर पिचई यांनी ट्वीटच्या माध्यमातून स्पष्ट केले.



सुंदर पिचई / सत्या नाडेला

मायक्रोसॉफ्टचे मुख्य कार्यकारी अधिकारी सत्या नाडेला यांनीही ट्वीटद्वारे प्रतिक्रिया व्यक्त करताना म्हटले, 'भारतातील सद्यःस्थिती हृदयद्रावक असून मी मनापासून दुःखी आहे. अमेरिकेचे सरकारही मदत गोळा करण्यासाठी प्रयत्नरत आहे याबद्दल मी कृतज्ञ आहे. अशा स्थितीत मोलाचे ठरतील असे ऑक्सिजन कॉन्सन्ट्रेटर उपकरणांच्या खरेदीसाठी मायक्रोसॉफ्टकडूनही संसाधने व तंत्रज्ञानाचा वापर केला जाईल.'

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जो बायडेन आणि उपाध्यक्ष कमला हॅरिस यांनी भारतीय जनतेला तातडीने आवश्यक वैद्यकीय जीवरक्षक सामग्री व उपकरणांचा तात्काळ पुरवठा करण्यासह, करोना संकटाचा सामना करण्यासाठी सर्व प्रकारच्या मदतीची ग्वाही दिली आहे. न्यूयॉर्कच्या जेएफके विमानतळावरून ३१८ फिलिप्स ऑक्सिजन कॉन्सन्ट्रेटर उपकरणांसह नवी दिल्लीकडे विमानाने उड्डाणही घेतले असल्याचे सांगण्यात आले.

**जाहिर नोटिस**

तमाम लोकांना ह्या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत संक्षेपाकरिता सदर मिळकती असा उल्लेख केलेला आहे की **श्री. रत्नाकर धुंडिराज लेले व श्रीमती इला रत्नाकर लेले** दोघेही रा. ३७/१८/६ अ प्रभात रोड लेन क्रमांक ६, स्वानंद, तिसरा मजला, एरंडवणे पुणे – ४११००४, सध्या रा. १४ कॅक्स्टन वे रॉमफोर्ड एसेक्स आर एम १४ जी एस यू. यांनी त्यांच्या मालकीची व हक्काची असल्याचे सांगीतले आहे. **श्री. रत्नाकर धुंडिराज लेले व श्रीमती इला रत्नाकर लेले** यांनी असे आश्वासित केले आहे की, सदर मिळकतीवरील त्यांचे स्वामित्व पूर्णपणे निर्वेध, निजोखमी, वादरहीत व बोजारहीत आहे. आमचे अशील हे सदर मिळकतीच्या खरेदीसाठी मिळकत मालक यांच्याबरोबर बोलणी करीत आहेत आणि आम्हाला मिळकत मालक यांचे सदर मिळकतीवरील स्वामित्व तपासण्याचे निर्देश दिलेले आहेत.

तरी सदर मिळकतीमध्ये इतर कोणाचाही विक्री, तारण–गहाण, भाडेपट्टा, लिन, बक्षीस, दान, वहिवाट, अदलाबदल, ताबा, वारसाहक्क व इतर कोणत्याही व कसलाही प्रकारचा हक्क, बोजा, हितसंबंध, वाद असल्यास, त्यांनी त्याबाबत योग्य त्या लेखी पुराव्यासह आमचे खालील नमूद पत्यावर ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांचे आत लेखी कळवावे व पोहोच घ्यावी. सदर मुदतीत कोणाचाही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरील मिळकतीमध्ये इतर कोणाचेही कसल्याही प्रकारचे हक्क, हितसंबंध नाहीत तसेच ज्या कोणाचेही सदर मिळकतीमध्ये अथवा त्यापैकी कोणत्याही भागामध्ये जे काही हक्क, हितसंबंध असतील ते त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिलेले आहेत असे समजून आमचे अशील सदर मिळकत मालक यांच्याशी पुढील योग्य ते व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर कोणाचीही हरकत मान्य करण्यात येणार नाही.

येणे प्रमाणे नोटीस दिली असे.

**परिशिष्ट**

तुकडी पुणे, पोट तुकडी ता. मुळशी, जि. पुणे व मा. दुय्यम निबंधक, मुळशी, पुणे यांच्या हद्दीतील तसेच पुणे जिल्हा परिषद यांचे हद्दीतील गाव मौजे भूगाव येतील अति. जिल्हाधिकारी सौ. यांनी मंजूर केलेल्या नकाशातील **सर्वे क्र. ४३६/१, ४३७ ते ४४१ व ४४३** मधील **प्लॉट क्र. २६** यासी **क्षेत्र ४०२४ चौ.मी.** (३% अधिक किंवा कमी) याशी चतु:सिमा खालील प्रमाणे :

**पुर्वेस** : सर्वे क्र. ४०६ ही मिळकत,
**दक्षिणेस** : रस्ता व प्लॉट क्र. ९१ व ९२ ही मिळकत,
**पश्चिमेस** : रस्ता व प्लॉट क्र. ३१ ही मिळकत,
**उत्तरेस** : प्लॉट क्र. ९१ ही मिळकत.

येणे प्रमाणे चतु:सिमा पुर्वक मिळकत सर्व हक्कासहीत व ४ सीझन्स बेटर लिविंग अँड मेन्टेनन्स कॉ–ऑप सोसायटी लिमिटेड मधील सदस्यता हक्कांसह व सदर सोसायटीच्या शेर सर्टिफिकेट क्र. ०५३ मधील अनुक्रमांक २६१ ते २६५ (दोनी समावेशक).

पुणे दिनांक : २६/०४/२०२१

डॉमिनिक ब्रागांझा ॲडव्होकेट
अभय नेवगी ॲण्ड असोसिएटस करीता
२.१, डॉ. हेरेकर पार्क, सी विंग, राजयोग,
कमला नेहरू पार्कजवळ, पुणे ४११००४
Cel. 09730319759, E-Mail :dominic@anevagi.com

**accelya**

**ACCELYA SOLUTIONS INDIA LIMITED**

**Registered Office :** "Accelya Enclave", 685/2B & 2C,1st Floor, Sharada Arcade, Satara Road, Pune – 411037 Tel: +91 20 66083777 Fax: +91 20 24231639
Email: accelyaindia.investors@accelya.com Website: w3.accelya.com
CIN: L74140PN1986PLC041033

Notice is hereby given that the Company has received intimation from the following shareholder/investor that share certificate pertaining to the equity shares held by him, as per details given below is stated to have been lost/misplaced/stolen and the holder/investor has applied for issue of duplicate share certificate.

| Sl. No | Folio No. | Name of Shareholder(s) | Share Cert. No. | Distinctive Nos. | | No. of Shares |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | KLE014500 | RAM LAKHAN AGARWAL | 44972 | 10311051 | 10311100 | 50 |

Public is hereby warned against purchasing or dealing in any way with the above share certificate. Any person(s) who has/have any claims in respect of the said certificate could lodge such claims with the Company or its Registrar at KFIN Technologies Private Limited, Karvy Selenium Tower B, Plot No 31 to 32, Gachibowli, Financial District, Nanakramguda, Hyderabad - 500 032 within 15 days of the publication of this notice, after which no claim will be entertained and the Company will proceed to consider issuing duplicate share certificate to the above mentioned shareholder/investor. Any person dealing with the above share certificate shall be doing so solely at his /her risk as to costs and consequences and the Company shall not be responsible for in any way.

For **Accelya Solutions India Limited**
Sd/-
**Ninad Umranikar**
Company Secretary

Place : Pune
Date : 26/04/2021

**SVC CO-OPERATIVE BANK LTD.** (Multi-State Scheduled Bank) ESTD.1906

**वसुली विभाग: २ रा.मजला, एसव्हीसी टॉवर, जवाहरलाल नेहरू मार्ग, वाकोला, सांताक्रुझ (पू) मुंबई ४०००५५ फोन: ०२२–७१९९९७५/९८६/९७१**
**विभागीय कार्यालय: ३०३ चिंतामणी प्राईड, सिटी प्राईड थिएटरजवळ, कोथरुड, पुणे दुर. ८२३७००६०७१, ८२३७०४६०७२, ८२३७००६०७३, ८२३७००६०७४**

**विक्रीसाठी जाहीर सूचना**

''जशी आहे जेथे आहे आणि जे काही आहे तत्त्व'' वर चारचाकी वाहन विक्री

| गाडी/ उत्पादन वर्ष व नोंदणी क्रमांक | राखीव किंमत | लिलावाची तारीख व वेळ |
|---|---|---|
| ह्युंदाई मोटर्स इंडीया लि. क्रेटा, १.४ सीआरडीआर, एस प्लस, रंग–फॅंडम ब्लॅक उत्पादन वर्ष २०१७ नोंदणी क्र एम एच १४ जीसी ८११८ | ६.८८ लाख अधिक लागु असलेले जीएसटी | १७/०५/२०२१ स. ११.०० वा. |
| मारूती सुझुकी इंडीया लि. मारुती एर्टीगा, व्ही ०८ एस आय व्ही रंग – एस सिल्वर उत्पादन वर्ष २०१६ नोंदणी क्र एम एच १२ आरआर १५२१ | ४.४५ लाख अधिक लागु असलेले जीएसटी | १७/०५/२०२१ दु. ०१.०० वा. |
| मारूती सुझुकी इंडीया लि. मारुती इग्नीस सिग्मा पेट्रोल, रंग पांढरा, उत्पादन वर्ष २०१७ नोंदणी क्र एम एच १४ जीए ६५३६ | २.७० लाख अधिक लागु असलेले जीएसटी | १७/०५/२०२१ दु.. ०३.०० वा. |

**वाहने पाहण्याचे ठिकाण: काव्या असोसीएटस्, बी, बीआर १, ऑफीस नं ३३४, जय गणेश व्हीजन, आकुर्डी पुणे – ४११०३५**

**अटी व शर्ती**

१. जाहीरातीत नमूद केलेल्या अटी व शर्ती नुसारच वाहनांची विक्री केली जाईल.
२. इच्छुक खरेदीदाराने आपले निविदा प्रस्ताव सीलबंद लिफाफ्यातून सादर करायचे आहेत. सोबत डीमांड ड्राफ्ट अथवा पे ऑर्डरने म्हणुन बोली रकमेच्या १०% इतकी रक्कम बयाणा ठेव म्हणुन डीमांड ड्राफ्ट अथवा पे ऑर्डरने जमा करायची आहे. हे डीमांड ड्राफ्ट अथवा पे ऑर्डर एसव्हीसी को–ऑप बँक लि. यांचे नवे काढलेले असावेत व पुणे येथे देय असावेत. निविदा बँकेच्या विभागिय कार्यलय, पुणे येथे दि. १५ / ०५ २०२१ रोजी दुपारी ०३.०० वाजेपर्यंत जमा करावयाचे आहेत.
३. इच्छुक खरेदीदारांना वाहनांची पाहाणी दिनांक ०७.०५.२०२१ रोजी सकाळी ११.३० ते दुपारी २.०० या वेळात वर नमूद केलेल्या पत्यावर करता येऊ शकेल. (टीप: इच्छुक खरेदीदाराने के वाय सी कागदपत्रांसह स्वत: किंवा आपल्या अधिकृत प्रतिनिधीद्वारा अधिकारपत्रासह व त्याच्या के. वाय सी कागदपत्रांसह पाठवावे )
४. कोणतेही कारण न देता कोणताही प्रस्ताव अथवा सर्व प्रस्ताव नाकारण्याचा अधिकार बँकने राखून ठेवला आहे. कोणताही प्रस्ताव, जो राखीव किमतीपेक्षा कमी किमतीचा आहे तो नाकारण्यात येईल.
५. सर्व वाहनांची जेथे आहे तेथे व जसे आहे तसे या तत्वावर विक्री केली जाईल. वरील सर्व वाहनांचा बँकेच्या कडे प्रत्यक्ष ताबा आहे.
६.खरेदीदाराने व्यवहार किंमतीच्या व्यतीरिक्त आवश्यक असलेले खर्च म्हणजेच आरटीओ टॅक्स, इन्शुरान्स, जीएसटी व वाहन नावावर करण्यासाठि लागणारा खर्च हे स्वत:करायचे आहेत.
७. कर्जदार वाहनावरील बोजा दि. १७/०५/२०२१ पुर्वी उतरवू शकतात.

ठिकाण : पुणे
दि. २७.०४.२०२१
सही
प्राधिकृत अधिकारी

यूनियन बैंक ऑफ इंडिया Union Bank of India
भारत सरकार का उपक्रम A Government of India Undertaking
आन्ध्रा Andhra कार्पोरेशन Corporation

**कराड शाखा : (१२७९), तळमजला, बुधवार पेठ, कराड – ४१५११०**
**ईमेल :** 12792@unionbankofindia.com

**मागणी नोटीस**

**[सिक्युरिटायझेशन अॅण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शियल अॅसेटस् अॅण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट,२००२ (सरफेसी अॅक्ट)च्या सेक्शन १३(२) अंतर्गत सिक्युरीटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल २००२ चा रुल ३(१) सह]**

**युनियन बँक ऑफ इंडिया, कराड शाखेमध्ये** असलेले, पुढे नमूद करण्यात आलेली खाती अनुत्पादक (एनपीए) ठरविण्यात आली आहेत, त्यावरुन बँकेने सरफेसी अॅक्टच्या सेक्शन १३(२) नुसार पुढे नमूद केलेल्या तारखेस सूचना जारी केल्या आहेत. पुढे नमूद करण्यात आलेले कर्जदार/जामीनदार यांच्या शेवटच्या माहित असलेल्या पत्त्यावर सदर नोटीसा बजावण्यात असफल ठरल्याने सर्व संबधितांच्या माहितीसाठी सदर नोटीस प्रसिध्द करण्यात येत आहे.

पुढे नमूद करण्यात आलेले कर्जदार/जामीनदार यांना कळविण्यात येते की, त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत **युनियन बँक ऑफ इंडिया, कराड शाखा** यांना खाली नमूद करण्यात आलेल्या तारखेस येणे असलेली रक्कम, करारात नमूद करण्यात आलेल्या दराने रक्कम परत करण्याच्या तारखेपर्यंतचे कर्ज/आणि अन्य करार आणि त्यानुसार संबंधित व्यक्तींनी सादर केलेल्या कागदपत्रांनुसार भविष्यातील व्याजासह परत करावी. सदर करार आणि कागदपत्रे यानुसार कर्जदारांची बांधिलकी म्हणून खाली दिल्याप्रमाणे त्यांच्या नावापुढे नमूद करण्यात आलेल्या मालमत्ता **युनियन बँक ऑफ इंडिया कराड शाखा** यांच्याकडे गहाण आहेत.

| अ. क्र. | कर्जदार/जामीनरांचे नाव आणि पत्ते | | मागणी नोटीसीनुसार येणे असलेली रक्कम |
|---|---|---|---|
| | कर्जाचा प्रकार | मागणी नोटीसीची तारीख | एनपीएची तारीख |
| १ | **१) श्री. अजित दिनकरराव पाटील (कर्जदार),** ए/ए५, रुक्मिणी नगरी, पार्ट एफ, कराड, जि. सातारा–४१५११०. **१) सतीश धोंडिराम पाटील (जामीनदार),** मु. पो. बिसुर, ता. मिरज, जि. सांगली. **२) श्री. दिनकरराव भुंजगराव पाटील (जामीनदार),** ए/ए५, रुक्मिणी नगरी, पार्ट एफ, कराड, जि. सातारा–४१५११०. | | रु. ५४,४७,२३१.३९ (रु. चौपन्न लाख सत्तेचाळीस हजार दोनशे एकतीस आणि पैसे एकोणचाळीस फक्त) आणि ७६,६३९.०३ (रु. शहात्तर हजार सहाशे एकोणचाळीस आणि पैसे तीन फक्त) + त्यावरील अनुक्रमे दि. ०१/०९/२०२० पासूनचे करारानुसार होणारे व्याज मासिक येण्यासहीत |
| | कर्जाचा प्रकार : ओडीजीईएन, डब्ल्यूसीटीएलएन | मागणी नोटीस : ०७/०४/२०२१ | एनपीएची तारीख : ३१/०८/२०२० |
| | **गहाण मालमत्तेचा तपशील : १) पुढील मालमत्तेचा सर्वसामाईक भाग –** सी. एस. नं. २४४९, २४५०, २४५१ व २४५२, आर. एस. नं. १७८+१८२/१+२, प्लॉट नं. ११, क्षेत्रफळ ५६६७ चौ. फू., शिवाजी सहकारी हाऊसिंग सोसायटी, शांतीनिकेतन समोर, ता. मिरज, जि. सांगली. येथे स्थित, **चतु:सीमा – पूर्वेस :** प्लॉट नं. २६ व २७, **पश्चिमेस :** सरकारी रस्ता, **उत्तरेस :** प्लॉट नं. १०, **दक्षिणेस :** प्लॉट नं. १२. | | |
| २ | **१) श्री. अजित दिनकरराव पाटील, २) सौ. अनिता अजित पाटील, (कर्जदार), दोघेही रा :** ए/ए५, रुक्मिणी नगरी, पार्ट एफ, कराड, जि. सातारा–४१५११०. **१) श्री. संजय मारुती साळुंखे (जामीनदार),** ए/ए५, रुक्मिणी नगरी, पार्ट एफ, ता. कराड, कराड, जि. सातारा–४१५११०. | | रु. ३२,२२,५५३.०१ (रु. बत्तीस लाख बावीस हजार पाचशे त्रेपन्न आणि पैसे एक फक्त) + त्यावरील दि. ०१/०९/२०२० पासूनचे करारानुसार होणारे व्याज मासिक येण्यासहीत |
| | कर्जाचा प्रकार : टर्म लोन हाऊसिंग | मागणी नोटीस : ०७/०४/२०२१ | एनपीएची तारीख : ३१/०८/२०२० |
| | **गहाण मालमत्तेचा तपशील : १) पुढील मालमत्तेचा सर्वसामाईक भाग –**स. नं. १४/१, प्लॉट नं. ३ए/५ए, रुक्मिणीनगर, भाग–I, मंगळवार पेठ, श्री हॉस्पिटल जवळ, कराड, जि. सातारा, एकूण क्षेत्रफळ ११५.७१ चौ. मी. आणि त्यावरील बांधकाम, **चतु:सीमा – पूर्वेस :** काझी यांची मालमत्ता, **पश्चिमेस :** रस्त्याचा आरखडा, **उत्तरेस :** श्री. माळी यांचा प्लॉट नं. ए–५ यांची मालमत्ता, **दक्षिणेस :** श्री. माळी यांचा प्लॉट नं. ए–६ यांची मालमत्ता | | |
| ३ | **१) मे. एफ स्टाईल गारमेंटस् प्रोप्रा. प्रमोद बाबूराव वडवने, २) प्रमोद बाबूराव वडवने (कर्जदार), दोघेही रा :** १८७ बी/४, गुरुवार पेठ, अर्बन बँकेजवळ, जि. सातारा–४१५११० **१) श्री. शशिकांत महादेव कदम (जामीनदार),** ९, नम्रता अपार्टमेंटस्, रुक्मिणी इस्टेट, कराड, जि. सातारा–४१५११०. | | रु. १३,८०,३१७.८९ (रु. तेरा लाख ऐंशी हजार तीनशे सतरा आणि पैसे एकोणनव्वद फक्त) + त्यावरील दि. ३०/०७/२०२० पासूनचे करारानुसार होणारे व्याज मासिक येण्यासहीत |
| | कर्जाचा प्रकार : सीएमटीएससी | मागणी नोटीस : ०७/०४/२०२१ | एनपीएची तारीख : ३०/०६/२०२० |
| | **गहाण मालमत्तेचा तपशील : १) पुढील मालमत्तेचा सर्वसामाईक भाग –**सी. एस. नं. १८७बी/४ व १८७बी/५, मिळकत नं. २३१/१८७, गुरुवार पेठ, कराड, जि. सातारा येथे स्थित, क्षेत्रफळ २२८.११ चौ. फू., **चतु:सीमा – पूर्वेस :** श्री. अब्दुल खातीब यांची मालमत्ता, **पश्चिमेस :** श्री. सदानंद कुलकर्णी यांची मालमत्ता, **उत्तरेस :** सामाईक लेन, **दक्षिणेस :** नगरपालिका रस्ता **आणि पूर्वेस :** प्लॉट नं. २६ व २७, **पश्चिमेस :** सरकारी रस्ता, **उत्तरेस :** प्लॉट नं. १०, **दक्षिणेस :** प्लॉट नं. १२ | | |
| ४ | **१) श्री. चंद्रकांत तानाजी धुमाळ, २) सौ. सुनिता चंद्रकांत धुमाळ (कर्जदार), दोघेही रा :** मु. पो. फ्लॅट नं. ३१, पुजा पार्क, बनवाडी रोड, तालुका कराड, जि. सातारा–४१५११० **१) श्री. रसाळ मनोहर लक्ष्मण (जामीनदार),** मु. पो. अगाशिव नगर, इंद्र प्रस्थ कॉलनी, कराड, जि. सातारा–४१५११० | | रु. ७,७१,३८७.७७ (रु. सात लाख एक्काहत्तर हजार तीनशे सत्याऐंशी आणि पैसे सत्त्याहत्तर फक्त) + त्यावरील दि. ०१/०५/२०२० पासूनचे करारानुसार होणारे व्याज मासिक येण्यासहीत |
| | कर्जाचा प्रकार : सीएचओएमई | मागणी नोटीस : ०७/०४/२०२१ | एनपीएची तारीख : ३०/०४/२०२० |
| | **गहाण मालमत्तेचा तपशील : १) पुढील मालमत्तेचा सर्वसामाईक भाग –** मिळकत नं. १६११, स. नं. ३१/२/१, फ्लॅट नं. ३१, ३रा मजला, सी विंग, पूजा पार्क, बनवाडी, कराड, ता. कराड, जि. सातारा–४१५११० येथे स्थित, प्लॉटचे क्षेत्रफळ ६२.४५ चौ. मी.,**चतु:सीमा – पूर्वेस :** सामाईक स्टेअरिंग पॅसेज, डक्ट आणि फ्लॅट नं. ३२ ची सामाईक भिंत, **पश्चिमेस :** सामाईक डक्ट आणि फ्लॅट नं. ३० ची सामाईक भिंत, **उत्तरेस :** बाजूची जागा आणि त्यानंतरचा श्री. कांता (कांती सुरत) रोहिदास रामगुडे यांची मालमत्ता, **दक्षिणेस :** सामाईक स्टेअरिंग पॅसेज, डक्ट आणि फ्लॅट नं. २५ ची सामाईक भिंत | | |

जर संबंधित कर्जदार /जामीनदार सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यानंतर **युनियन बँक ऑफ इंडिया, कराड शाखा** यांना येणे असलेली रक्कम परत करण्यास असफल ठरले तर, वर नमूद केलेल्या तारण मालमत्तांच्या संदर्भात सदर अॅक्टच्या सेक्शन १३(४) आणि लागू होणारे रुल्स यांसह संबंधित कर्जदार / जामीनदार यांच्या खर्च आणि परिणामांसह जोखमीवर कारवाई करण्याचा **युनियन बँक ऑफ इंडिया, कराड शाखेला** अधिकार आहे. सरफेसी अॅक्टमधील तरतुदींनुसार संबधित कर्जदार /जामीनदार यांना सदर मालमत्ता, कोणत्याही प्रकारे विक्री, भाडेपट्टा किंवा अन्य मार्गाने **युनियन बँक ऑफ इंडिया, कराड शाखेच्या** लेखी अनुमतीशिवाय हस्तांतरीत करण्यास प्रतिबंध करण्यात येत आहे. सदर तरतुदींचा भंग केल्यास सदर व्यक्ती सरफेसी अॅक्टमधील तरतुदींनुसार शिक्षा आणि/ किंवा दंडास पात्र ठरेल. सुरक्षित आस्ति सोडविण्यासाठी संलग्न उपलब्ध वेळेमध्ये कर्जदाराचे लक्ष सदर कायद्याच्या सेक्शन १३(८) अंतर्गत तरतुदींकडे वेधून घेतले जात आहे. आणखी तपशिलासाठी बजावण्यात येऊ न शकलेल्या नोटीसा खाली सही करणार यांच्याकडे मिळू शकतील.

**दिनांक : ०७/०४/२०२१**
**स्थळ : कराड**

**अधिकृत अधिकारी,**
**युनियन बँक ऑफ इंडिया**

लोकसत्ता Classifieds
FROM ANYTHING TO EVERYTHING.

**मालमत्ताविषयक**

**महाडला** ३ एकर जमीन ५ लाखांत खरेदी करा. दर महिना १० हजार उत्पन्नही मिळवा. ही ऑफर प्रथम १० खरेदीधारकांसाठीच बुकिंगसाठी. 8855921341/ 9175284426.
0070739228-1

**नावात बदल**

**माझे** जुने नाव अमोल विजय वर्धे हे बदलले असून नवीन नाव देवेंद्र विजय वर्धे असे झाले आहे. आधार कार्ड नं. ८३४६९८२१२२६६
0090284971-2

I Have Changed my Old Name Miss Shubha Murari Shinde New name Mrs.Sharmila Sham More Noted reg. no 1724/2021
0090284970-2

I Have Changed my Old Name Joshua Guha New Name to Joshua Nathan GuhaAadhar card no 9802 3222 9802
0090284970-1

जाहिरात छोटी प्रतिसाद मोठा

**यात्रा विशेष**

**यात्रासहल**

**देशपांडे ट्रॅव्हल्स**
सिमला-कुलूमनाली डलहौसी-धरमशाला चंदिगड-अमृतसरसह
13 दिवस, 10 मे, 35,500/-
चारधामयात्रा-हरिद्वार-ऋषिकेशसह
31,500/-, 13 दिवस, 17 मे, 27 मे, 7 जून, 17 जून
वैष्णोदेवी-काश्मिरसह
24,500/-, 11 दिवस, 3 टायर एसी 13, 20, 27 मे
अष्टविनायक दर्शन-जेजुरी-आळंदीसह
कॉमन स्टे 2,451/-, हॉटेल स्टे 3,351/- 3 दिवस, शुक्रवारी
तुळजापूर-पंढरपूर-गाणगापूर-अक्कलकोटसह
कॉमन स्टे 2,751/-, हॉटेल स्टे 3,351/- 4 दिवस, गुरुवारी
गणपतीपुळे-पावस-मार्लेश्वर डेरवण-रत्नागिरीसह
3,551/-, हॉटेल स्टे 4,751/-, गुरुवारी
9820962500
9819453043
www.deshpandetours.com
0070734819-23-5

**महत्त्वपूर्ण निवेदन**

वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातींचा मजकूर (ॲडव्हर्टाईजिंग कॉपी) स्वीकारण्यापूर्वी काळजी घेतली जात असली तरी त्याच्या आशयाची (कन्टेन्ट) पडताळणी करणे शक्य होत नाही. तरी, आपल्या वृत्तपत्रांमध्ये अथवा प्रकाशनांमध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातींतील जाहिरातदार कंपन्या, सहयोगी संस्था अथवा व्यक्तींबरोबर व्यवहार केल्यामुळे कोणत्याही स्वरूपाचे नुकसान वा हानी झाल्यास त्यासाठी अथवा संबंधित जाहिरातीतील आशयासाठी द इंडियन एक्स्प्रेस (प्रा.) लिमिटेडला जबाबदार ठरविता येणार नाही. त्यामुळे वाचकांना आम्ही असा सल्ला देतो की, जाहिरातदारांना कोणतीही रक्कम प्रेषित करण्यापूर्वी अथवा त्यांच्याबरोबर कोणत्याही स्वरूपाचे संमतिपत्र कार्यसिद्ध करण्यापूर्वी अथवा एखाद्या जाहिरातीवर आधारित कोणतीही कृती करण्यापूर्वी त्यांनी आवश्यक ती चौकशी करण्याची खबरदारी घ्यावी.